दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.२४ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २०६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 24 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 206 | Pages 4 | Rate 4 Rs


### मुंबईत मिळकतीचे फेरफार आता ऑनलाईन

**मुंबई**–मुंबई शहर जिल्ह्यातील मिळकतीच्या फेरफार प्रक्रियेला आता डिजिटल गती मिळाली असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईतील सुमारे ३० लाख नागरिकांना याचा लाभ होणार आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत विधानसभेत निवेदन करताना सांगितले. मुंबईत प्रथमच मिळकतीचे फेरफार ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, मुंबई शहर व उर्वरित महाराष्ट्रातील प्रॉपर्टी कार्ड संगणकीकरणाच्या प्रणाली वेगवेगळ्या असल्यामुळे आतापर्यंत मुंबईत ऑनलाईन फेरफार प्रक्रियेत अनेक तांत्रिक अडचणी येत होत्या. मात्र नागरिकांची वाढती मागणी लक्षात घेऊन शासनाने या प्रक्रियेला गती दिली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील १९ महसूल विभाग व ४ नगर रचना योजनांमधील सुमारे २७,८४७ मिळकती पत्रिका https://mahabhumi.gov.in/ या संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# खरातचे सर्वाधिक पुरावे माझ्याकडेच केवळ फोटोवरून राजकारण नको

## इंटेलिजन्सच्या आधारे आम्हीच भांडाफोड केली–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### फोटो कुणाचेही असू शकतो

**देवेंद्र फडणवीस म्हणाले की, खरात प्रकरणाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न सुरू आहे. कुणाजवळ काही पुरावा असेल तर त्यांनी तो नक्की आणून द्यावा त्यावरही कारवाई होईल. पण विनाकारण प्रत्येक गोष्टीला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करू नये. सरकार आणि पोलिस जे करायचे ते करत कठोर कारवाई करतील. फोटो कुणाचेही असू शकतो, पण ज्यांनी मंत्रिमंडळाची बैठक बोलावून ४० किलोमीटरची पाइपलाइन वळवून अशोक खरातच्या संस्थेला पाणी दिले, त्या मंत्र्यांबाबत विरोधक गप्प का आहेत? केवळ फोटोवरून राजकारण करणाऱ्यांनी या धोरणात्मक निर्णयावर का मौन पाळले आहे?**

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

भोंदू बाबा अशोक खरात यांच्याकडे विरोधी पक्षातील कोणकोणते नेते जात होते याचे मी पुरावे देऊ शकतो. माझ्याकडे सर्वात जास्त पुरावे आहेत, पण ते पोलिसांकडे आहेत, ते पोलिसांचे काम आहे, खरातांना भेटणाऱ्यांपैकी कुणाचे यात सहभाग असेल तर कारवाई होईल, पण केवळ भेटलंय म्हणून कारवाई करायला लागलो तर कोणी त्यांना ४० किमी पाण्याची लाईन दिली हे सर्वांना समजले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भोंदू बाबा प्रकरणी हवेत बोलण्याला काही अर्थ नाही. खरात प्रकरण अत्यंत गंभीर आहे, त्या प्रकरणाचा भांडाफोडा आम्हीच केला आहे. या प्रकरणात महिला लाजेखातर पुढे येत नाही, पण पिडीत महिलांना त्यांच्या कुटुंबियांना धीर देत पुढे आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. यात काही महिला प्रतिसाद देत आहेत. प्रकरणाकडे लक्ष घालण्याच्या सूचना मी डीजींना दिल्या आहे ते या सर्व प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत. एसआयटी आणि नाशिक सीपी मिळून हे काम पूर्ण करत आहेत. या प्रकरणी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.



### महिलेला न्याय देण्याचा प्रयत्न करणार

**देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्हाला राजकारणात नाही तर महिलांच्या प्रतिष्ठेत इंटरेस्ट आहे. महिलांवर जे अन्याय झालेत त्यासंदर्भात आधी चौकशी होईल, प्रत्येक महिलेला न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत, महिलांना न्याय देण्यासाठी चौकशी करणार.**

# माणुसकीच्या नात्याला काळिमा! केज तालुक्यात नराधम चुलत्याकडून विवाहित पुतणीवर अत्याचार

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

रक्ताच्या नात्याला आणि माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना केज तालुक्यात उघडकीस आली आहे.एका ५० वर्षीय नराधम चुलत्याने आपल्या २५ वर्षीय विवाहित पुतणीला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.या प्रकरणी युसूफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपीचा कसून शोध घेत आहेत.




**गुंगीचे औषध देऊन कृत्ये**

मिळालेल्या माहिती नुसार,पीडित २५ वर्षीय विवाहित तरुणी दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी केज तालुक्यातील एका गावात आपल्या माहेरी आली होती.दुपारी १-३० ते ३-३० वाजण्याच्या सुमारास,शेजारीच राहणाऱ्या तिच्या नात्याने चुलताअसलेल्या ५० वर्षीय आरोपीने तिला पिण्याच्या पाण्यातून गुंगीचे औषध दिले.तरुणी बेशुद्ध पडल्यानंतर नराधमाने तिच्या हतबलतेचा फायदा घेत तिच्यावर पाशवी अत्याचार केला.

**जीवे मारण्याची धमकी आणि पाच महिन्यांचा दहशतवाद**

अत्याचार केल्यानंतर या नराधम चुलत्याने पीडितेला अत्यंत क्रूरपणे धमकावले.जर ही घटना कोणाला सांगितली,तर तुझ्या आई-वडिलांना संपवून टाकीन अशी धमकी दिल्याने पीडिता प्रचंड दहशतीखाली होती.या भीतीपोटी तब्बल पाच महिने पीडितेने हा मरणयातना देणारा प्रसंग मनातच दडवून ठेवला होता.

**पोलीस कारवाई आणि गुन्हा दाखल**

मात्र,अखेर पीडितेने धीर एकवटून आपल्या आई- वडिलांना घडलेला सर्व प्रकार सांगितला. कुटुंबाच्या पाठिंब्यानंतर शनिवारी सायंकाळी युसूफवडगाव पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली.पोलिसांनी या प्रकरणी आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ६४ (२) (एफ),कलम ३५१ (२) नुसार गुन्हा रजिस्टर नंबर ६८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

**आरोपी फरार, पोलिसांची पथके रवाना**

घटनेची वाच्यता होताच आरोपी फरार झाला असून तो जिल्ह्याबाहेर पळून गेल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शना खाली उप निरीक्षक भारत बर्डे या प्रकरणाचा तपास करत आहेत. आरोपीला लवकरात लवकर बेड्या ठोकण्या साठी पोलिसांनी विविध ठिकाणी पथके रवाना केली आहेत.या घटनेमुळे संपूर्ण केज तालुक्यात संताप व्यक्त केला जात आहे.

# रमजान ईदनिमित्त पाथर्डीत हिंदू मुस्लिम ऐक्याचा आदर्श संदेश

दैनिक वादळ वार्ता

**पाथर्डी | प्रतिनिधी**

रमजान ईदच्या पवित्र सणानिमित्त पाथर्डी शहरात हिंदू-मुस्लिम ऐक्याचा सुंदर संदेश देणारी घटना घडली. श्री शंकर बाबा मठाचे मठाधिपती श्री संत माधव बाबा यांनी ईदनिमित्त कवी हाजी हुमायून भाई आतार यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत मुस्लिम बांधवांना ईदच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी पाथर्डीचे उद्योजक रवी दादा पाथरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नगराध्यक्ष अभय काका आव्हाड व ज्येष्ठ नेते प्रताप काका ढाकणे यांनीही ईदगाह मैदानावर उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांना रमजान ईद च्या शुभेच्छा दिल्या समाजात सलोखा व बंधुभाव दृढ करण्याचा संदेश दिला.

भेटीदरम्यान माधव बाबांनी कवी हाजी हुमायून भाई आतार यांना ईदनिमित्त ५५१ रुपयांची भेट देत प्रेम, स्नेह आणि एकतेचा संदेश दिला. कोणताही भेदभाव न ठेवता सर्व समाजाला एकत्र आणण्याचा त्यांचा प्रयत्न सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.'ना हिंदू ना मुस्लिम' असा संकुचित विचार



न ठेवता सर्व धर्मांचा सन्मान राखण्याची भूमिका माधव बाबा सातत्याने मांडत आहेत. त्यांच्या या सर्वसमावेशक कार्यामुळे मुस्लिम समाजातही त्यांच्याबद्दल मोठा आदर व श्रद्धा निर्माण झाली आहे.श्री शंकर बाबा महाराजांनी सुरू केलेल्या आध्यात्मिक व सामाजिक कार्याची परंपरा माधव बाबा निष्ठेने पुढे नेत असून, केवळ प्रवचनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून समाजप्रबोधनाचे कार्य ते करत आहेत. सर्वधर्मीय बांधवांना एकत्र गुंफण्याचा त्यांचा प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव जपण्याचे आवाहन केले.

## तळोदा येथे भीमजयंती उत्सव समितीची स्थापना; अध्यक्षपदी सिद्धार्थ नरभवर यांची बिनविरोध निवड



दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी १३५ व्या जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी तळोदा शहरात जय्यत तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सामाजिक सभागृह येथे आयोजित विशेष बैठकीत 'भीमजयंती उत्सव समिती' गठीत करण्यात आली असून, अध्यक्षपदी सिद्धार्थ नरभवर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.उत्सव उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी बैठकीत कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये उपाध्यक्षपदी दिनेश ब्राम्हणे, सचिवपदी संघप्रिय नरभवर, सह-सचिवपदी देवेंद्र शिंदे, खजिनदारपदी संदीप जावरे तर सह-खजिनदारपदी शरद सावळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

उत्सवाच्या यशस्वीतेसाठी मार्गदर्शक म्हणून अनुभवी कार्यकर्त्यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यात प्रामुख्याने प्रा. मुकेश कापुरे, सुभाष शिंदे, संतोष केदार, सुनील बागुल, हंसराज महाले, राजेश नरभवर, अनिल पवार, सुरेश रामराजे, राकेश सावळे, सुनील खैरनार, कपिल खैरनार, पारस जावरे, राहुल बर्डे, भरत पानपाटील, राहुल ब्राह्मणे, रोहित अहिरे, संदिप सामुद्रे, महेंद्र सामुद्रे आणि आनंद शिंदे यांचा समावेश आहे.

या बैठकील समाजातील प्रतिष्ठित नागरिक आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. नवीन समिती निवडीनंतर उपस्थितांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले असून, यावर्षीचा जयंती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# मुंबईतील सफाई कामगार यांना मिळणार हक्कांची घरे

## उपाध्यक्षांच्या पुढाकारानंतर मुख्यमंत्र्यांचे ठोस आश्वासन

### 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना' अधिवेशनात जाहीर होणार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | अरविंद बनसोडे कुरनूरकर**

मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी मोठा दिलासा देणारी घडामोड घडली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना अंतर्गत त्यांना हक्काची घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या पुढाकाराने म्युन्सिपल मजदूर युनियनच्या शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने शासन निर्णय २००८ व २०१५ ची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत, मुंबई महापालिकेने नव्याने उभारलेल्या घरांपैकी ५० टक्के घरे सफाई कामगारांना मालकी हक्काने देण्याचे ठोस आश्वासन दिले. तसेच या योजनेची अंमलबजावणी येत्या



अधिवेशनात जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या मागणीसाठी म्युन्सिपल मजदूर युनियन, मुंबईच्या वतीने २३ मार्च रोजी आझाद मैदान येथे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र आंदोलनापूर्वीच उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी मध्यस्थी करत मुख्यमंत्री यांची भेट घडवून आणली आणि तोडगा काढण्यात यश मिळवले.मुंबई महापालिका क्षेत्रातील एकूण ३६ वसाहतींचे पुनर्वसन करण्यात आले असून सुमारे १२,२०० नवीन घरे उभारण्यात आली आहेत. यापैकी ५० टक्के घरे सफाई कामगारांना देण्याचा निर्णय घेतल्याने हजारो कुटुंबांना स्थिर निवासाची संधी उपलब्ध होणार आहे.या बैठकीस विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, म्युन्सिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव, वामन कविस्कर, हिंदुराव जाधव आदी उपस्थित होते.

# संपादकीय

## ‘कोकणचा राजा’ जायबंदी!

फेब्रुवारी ते जूनदरम्यान मुंबईच्या फळ मार्केटमध्ये हापूस आंब्याच्या विक्रीला मोठी गती मिळत असून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कोट्यवधींची उलाढाल झाली. रत्नागिरी व देवगड हापूसची आवक अवकाळी पाऊस आणि कीड हल्ल्यांमुळे घटली असून त्यामुळे दर गगनाला भिडले आहेत. आखाती युद्धामुळे निर्यात ठप्प झाल्याने यंदा स्थानिक बाजारात हापूस आंबा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाला आहे.


फेब्रुवारी ते जून या पाच महिन्यांच्या कालावधीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ मार्केटमधील उलाढालीला कमालीची गती मिळालेली असते. फळ मार्केटमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच परराज्यातूनही फळे विक्रीला येत असतात. या मार्केटमध्ये देशाच्या अनेक राज्यांतून आंबे विक्रीला येत असले तरी कोकणचा हापूस हा आंबा खवय्यांच्या पसंतीचा असतो. वर्षभर वाट पाहिलं, पण खाल्ला तर हापूसच खाईन, असे आंबाप्रेमी अभिमानाने सांगत असतात. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया, राम नवमी व अन्य सणांना घराघरांमध्ये हापूस आंब्याच्या रसाचा कार्यक्रम ठरलेलाच असतो. त्यामुळे अन्य दिवसांच्या तुलनेत या दिवसांसाठी आंबा विक्रीच्या उलाढालीचा आलेख कमालीचा उंचावलेला असतो. कोकणच्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा तीन जिल्ह्यांतून मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल येथील नागरिकांसाठी आंबा विक्रीला येत असला तरी रायगडच्या तुलनेत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हापूसला अधिक मागणी असते व चवीचा दर्जाही काही वेगळाच असतो. भाज्या आणि फळभाज्या मार्केटमध्ये विक्रीला शेतकऱ्यांकडून थेट येत असतात. हापूस आंब्याचे गणित त्या तुलनेत वेगळे असते. मार्केटमध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आंबा थेट विक्रीला पाठविण्याचे प्रमाण नगण्य असते. मार्केटमधील व्यापारीच कोकणात जाऊन थेट बागांचाच सौदा करत असल्याने फळांचे पैसे शेतकऱ्याला जागेवरच उपलब्ध होत असतात. गुढीपाडव्याच्या दिनी मार्केटमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल आंबा विक्रीतून झालेली आहे. खवय्यांची आंब्याला असलेली पसंती पाहून अन्य राज्यातील आंबा उत्पादक महाराष्ट्रातील शहरी भागातील मार्केटमध्ये आंबा विक्रीला पाठवत असतात. कोकणच्या हापूसच्या खालोखाल कर्नाटकच्या आंब्याने मार्केट व्यापलेले असते. एपीएमसी मार्केटमधील प्रत्येक विंगमधील गाळ्यागाळ्यावर हापूस आंब्यांनी जागा व्यापलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातून रत्नागिरी, लांजा, राजापूर भागातून तर सिंधुदुर्गचा देवगड हापूस विक्रीला आला आहे. रायगड जिल्ह्यातील किनारपट्टी भागातूनही हापूस आंबा विक्रीला आला आहे. जानेवारी महिन्यापासूनच हापूस आंब्याची मार्केटला तुरळक आवक येण्यास सुरुवात होते, एप्रिलच्या मध्यापासून हापूस आंब्याची आवक वाढून दररोज लाखांच्या संख्येने हापूस आंब्याच्या पेट्या मार्केटमध्ये विक्रीला येत असतात. आवक वाढल्यावर याच कालावधीत हापूस आंब्याचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतात. मार्केटमध्ये कोकणच्या हापूस आंब्याव्यतिरिक्त केरळ, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातूनही काही प्रमाणात ‘हापूस’ सदृश आंबा विक्रीसाठी येत असतो. दरवर्षीच्या तुलनेत हापूस आंब्याची आवक कमी झालेली आहे. फुलोऱ्याच्या वेळी झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि कीड हल्ल्यांमुळे आंब्याच्या काढणीला विलंब झाला असून, रत्नागिरी आणि देवगड हापूसची आवक घटली आहे आणि शहरभरातील हंगामाच्या सुरुवातीच्या पुरवठ्याचे स्वरूप बदलले आहे. आंबा आवकच मंदावल्याने किमती गगनभरारी घेत आहेत. हापूसचे दर ५ ते ९ डझनाच्या पेटीचे २ ते ८ हजार रुपये आहेत. आखाती युद्ध सुरू असल्याने हापूस आंब्याची हक्काची बाजारपेठ ओळखली जाणाऱ्या आखाती देशांमध्ये हापूसची निर्यात अजून सुरू झालेली नाही व युद्धामुळे लवकर निर्यात होण्याची शक्यताही नाही. त्यामुळे स्थानिक बाजारातील मार्केटमध्ये आंबा विकला जाणार असल्याने यंदा खवय्यांना आंबा मुबलक प्रमाणावर उपलब्ध होणार आहे.गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मुंबई शहर व उपनगरामध्ये जवळपास ३२ कोटी ५० लाख रुपयांच्या आंब्याची विक्री झाली आहे. यामध्ये १० कोटी रुपयांच्या कर्नाटक आंब्याची, तर उर्वरित २२ कोटी ५० लाख रुपयांच्या कोकणमधून आलेल्या हापूस आंब्याची विक्री झालेली आहे. युरोपीय देशांमधून हापूस आंब्याला फारशी मागणी नसल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आखाती देशांमधील बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागत आहे. आखाती युद्धामुळे रमजानचा महिना असतानाही अन्य फळांची विक्री न झाल्याने फळ उत्पादकांना यंदा प्रचंड फटका बसला आहे. इराण आपला फळांचा मुख्य ग्राहक असून कलिंगड, डाळिंबसह अन्य भारतीय फळांना रमजानच्या महिन्यात इराणमधून सर्वाधिक मागणी असते. त्याखालोखाल अन्य आखाती देशांतून विशेषत: दुबईतून अधिक मागणी असते. सध्या आखाती युद्ध सुरू असल्याने निर्यातदार व्यापाऱ्यांचे नुकसान प्रचंड झाले आहे. त्यांना शेतकऱ्यांच्या बागा विकत घेऊन त्यातील आंबे आता स्थानिक बाजारांमध्ये विकण्याची वेळ आलेली आहे. हापूसला असलेली मागणी व मिळणारा दर पाहून देशातील अन्य आंबा हापूसच्या नावाखाली विकण्याचा प्रकारही काही ठिकाणी होत असतो. खऱ्या खवय्यांना हापूस आंबा लगेच ओळखता येतो आणि इतरांच्या नशिबी फसगत येते. कोकणचा हापूस हा रंगावरून नाही तर गंधावरून ओळखता येतो. त्यामुळेच हापूस घेताना आधी वास घ्या, रंग पाहू नका. खऱ्या कोकण हापूसला एक तीव्र, नैसर्गिक सुगंध असतो जो दुरूनही जाणवतो, अशी माहिती आंबा खवय्यांकडून देण्यात येते. पिकल्यावर हापूस आंबे गडद केशरी-पिवळे असतात. ते कधीही निस्तेज किंवा डागाळलेले नसतात. आंब्याची पातळ, नाजूक त्वचा जी स्पर्शाला मऊ आणि मुलायम वाटते. हापूसच्या नावाखाली स्थानिक बाजारामध्ये अधिक नफा कमविण्यासाठी अन्य जातीचे आंबे बनावट हापूस म्हणून विकण्याचा प्रकार घडत असतो. जाड साल, अधिक टणकपणा, अधिक तंतुमय पोत आणि लक्षणीयरीत्या कमी सुगंध ही अल्फोन्सो नावाने विकल्या जाणाऱ्या दक्षिणेकडील जातींची वैशिष्ट्ये आहेत. एपीएमसी मार्केट, दादर मार्केट, क्रॉफर्ड मार्केट आणि मुंबई शहर व उपनगरातील आंबा व्यापारी ग्राहकांची आंबा मागणी पूर्ण करण्यासाठी दक्षिणेकडील आंब्यांच्या जातीचा साठा करत आहेत, तर दुसरीकडे अस्सल देवगड हापूस दुर्मीळ, महागडा असून खरेदीदारांना तो ओळखणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. फुलोऱ्याच्या वेळी झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि कीड हल्ल्यांमुळे काढणीला विलंब झाला असून, रत्नागिरी आणि देवगड हापूसची आवक घटली आहे. आंबा उत्पादनात घट झालेली असतानाही सुरू असलेल्या आखाती युद्धामुळे स्थानिक बाजारांमध्ये हापूस आंबा विक्रीसाठी मुबलक प्रमाणात उपलब्ध झाला आहे.

# राज्यातील हॉटेल,उपहारगृह चालकांना दिलासा व्यावसायिक गॅस पुरवठ्यात २०% वाढ

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

इराण विरुद्ध अमेरिका - इस्त्रायल युद्धामुळे अडचणीत सापडलेल्या राज्यातील हॉटेल, ढाबे व उपहारगृह चालकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार व्यावसायिक गॅसचा पुरवठ्यात २० टक्क्यांची वाढ करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी रविवारी दिली. यामुळे छोट्या व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आखाती देशांत सुरू असलेल्या युद्धामुळे सरकारने व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर निर्बंध घातले होते. केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने २१ मार्च रोजी जारी केलेल्या सूचनेनुसार यापूर्वी राज्याला केवळ ३० टक्के एलपीजी वाटप मंजूर होते. आता २३ मार्चपासून पुढील आदेश येईपर्यंत अतिरिक्त २० टक्के वाटप वाढवण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा हा संकटपूर्व पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या वाढीव २० टक्के गॅस पुरवठ्यात हॉटेल्स, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टिन, अन्न प्रक्रिया उद्योग व दुग्ध व्यवसायाला प्राधान्य देण्यात येणार आहे.याशिवाय राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालवण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टिन, कम्युनिटी किचन्स तसेच स्थलांतरित मजुरांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. 'प्रस्तुत निर्णयामुळे व्यावसायिक एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल व अन्नपदार्थ व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळेल. पण गॅस मिळवण्यासाठी त्यांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे व पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे आवश्यक असणार आहे', असे छगन भुजबळ यांनी सांगितले आहे.



# धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्या चैत्र नवरात्रौत्सवात ‘आगरी कोळी बाणा’ ने भरले रंग

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाण्याच्या कोपरीतील संत तुकाराम मैदानात सुरू असलेल्या चैत्र नवरात्रोत्सवात शुक्रवारी लोकपरंपरेच्या रंगांची अनोखी उधळण झाली. धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्या वतीने आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आयोजित चैत्र नवरात्रौत्सवात श्री अंबे माँ चरणी आगरी-कोळी संस्कृतीचा साज चढला. अविनाश काबाडी, शशांक पाटील आणि पौर्णिमा काकडे यांच्यासह नामवंत कलाकारांनी सादर केलेल्या ‘आगरी कोळी बाणा’ या बहारदार गीत-संगीत-नृत्य कार्यक्रमाने पारंपरिक ठेक्यावर रसिक भाविकांना थिरकायला भाग पाडले. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांची विशेष उपस्थिती होती.राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने धर्मवीर श्री आनंद दिघे



प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित चैत्र नवरात्रौत्सवात शुक्रवारी आगरी-कोळी परंपरेचा सुरेल आणि रंगतदार अविष्कार पाहावयास मिळाला. कोपरीच्या संत तुकाराम मैदानात पार पडलेल्या ‘आगरी-कोळी बाणा’ या संगीतमय कार्यक्रमाने उपस्थित रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. नामवंत कलाकार अविनाश काबाडी, शशांक पाटील आणि पौर्णिमा काकडे यांनी आगरी-कोळी संस्कृतीची झलक गीत, संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून सादर केली. नारळी पौर्णिमेपासुन विविध सणासुदीत गाजलेली गाणी तसेच कोळीवाड्यातील २१ दिवसीय गणेशोत्सवाचे गीतातून वर्णन केले. पारंपरिक कोळी गीतांपासून ते १९७०-८० च्या दशकातील मी डोलकर... यासारख्या लोकप्रिय गीतांच्या सादरीकरणाने वातावरण भारावून गेले. सुशीलकुमार यांनी कार्यक्रमाचे ओघवत्या शैलीत निवेदन करताना सण-उत्सवांचे महत्त्व तसेच साडेतीन शक्तीपीठांचा महिमा रसिकांसमोर प्रभावीपणे उलगडला. एकंदरीत आगरी-कोळी परंपरेच्या सुरावटींनी चैत्र नवरात्रौत्सवात सांस्कृतिक उर्जा आणि आनंदाची उधळण केली.ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर आणि अभिनेते मंगेश देसाई यांच्या हस्ते देवीची साग्रसंगीत महाआरती करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, महापौर शर्मिला पिंपळोलकर, शिवसेना सचिव संजय मोरे, ठामपा अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, माजी खासदार राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, प्रकाश कोटवानी आदीसह शिवसेनेचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अनधिकृत झोपड्यामध्ये रात्रीचा खेळ चाले

### रोडपाली तलावाजवळील अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करून ती निष्कासित करण्यात याव्यात-नगरसेविका मनाली ठाकूर

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

शहरांमधील अनधिकृत बांधकामे, बेकायदेशीर होर्डिंग्ज आणि अतिक्रमणांमुळे शहराचे नियोजन कोलमडून पडले असून शहराचे विद्रुपीकरण होत होत आहे.

स्वच्छ भारत अभियानाला गालबोट लागत आहे. प्रशासनाच्या सुस्त धोरणामुळे फुटपाथ, रस्ते आणि मोकळ्या जागांवर बेकायदेशीर ताबा मिळवला जात आहे. यामुळे शहराचे सौंदर्य नष्ट होत आहे. रोडपाली गाव तलावाजवळील झोपडपट्यांवर अतिक्रमण कारवाई करून त्या तात्काळ निष्कासित करण्यात याव्यात अशी मागणी पनवेल महानगर पालिकेच्या नगरसेविका मनाली अमर ठाकूर यांनी पालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्याकडे केली आहेपनवेल महानगरपालिका प्रभाग क्र.७ गाव तलावाच्या बाजूस असलेल्या नाल्याच्या पुलाशेजारी अंदाजे ७० ते ८० झोपड्या अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदर परिसराचे मोठ्या प्रमाणावर विदृपीकरन झालेले असून स्वच्छता, सुरक्षितता व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर समस्या निर्माण झालेल्या आहेत. तसेच या ठिकाणी अनधिकृत व बेकायदेशीर कृत्ये सुरु असण्याची शक्यता नाकारता येत नाहीत. कोण कुठून आले आहेत कोण राहत आहे याचा काहीही ठावठिकाणा लागत नाही. येथे रात्रीच्या वेळी खेळ चालत आहेत.सदर बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून प्रभाग क्र. ७. रोडपाली गाव तलावाच्या बाजूस नाल्याच्या पुलाशेजारी अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या झोपड्यांवर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महानगरपालिके मार्फत तात्काळ अतिक्रमण कारवाई करून त्या निष्कासित करण्यात याव्यात अशी विनंती नगरसेविका मनाली अमर ठाकूर यांनी पनवेल महानगर पालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्याकडे केली आहे.



# महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारणी बैठक व पदभार सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील ३३ ओबीसी जाती समूहाचे केंद्रीय ओबीसी सूची मध्ये समावेश करणेकरीता तसेच विविध शिष्यवृत्ती व ओबीसी संदर्भात माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी राज्यातील ३३ सर्व विविध ओबीसी समाज संघटनांचे प्रतिनिधी यांनी एकत्र येऊन महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची स्थापना सन २०२४ मध्ये केली आहे, आणि ओबीसी कृती समिती तर्फे संयुक्त केंद्रीय आरक्षणासाठी पाठपुरावा सुरु आहे, अंतिम मंजुरी केंद्रीय कॅबिनेट मान्यतेसाठी प्रलंबित असून लवकरच निर्णयाच्या प्रतिक्षेत आहे.याच अनुषंगाने लेवे गुजर समाज व कराडी समाजच्या वतीने महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारिणीची राज्यव्यापी बैठक व पदभार सोहळा रविवार दिनांक २२ मार्च २०२६ रोजी लेवे गुजर भवन, सेक्टर २७, प्लॉट नंबर ५७ रांजणपाडा, श्रीराम मंदिरच्या पाठीमागे, पेठपाडा मेट्रो रेल्वे स्टेशन जवळ खारघर, पनवेल, नवी मुंबई येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत मोठया उत्साहात संपन्न झाला.यावेळी संरक्षक मंडळचे पदाधिकारी डॉ. नामदेवराव राऊत, प्रकाश सिद्ध, पी आर बडगुजर, एस एम बडगुजर, शालिकजी नेवारे, मधुकरजी चोपडे, हेमंत ढोले, अध्यक्ष श्रावण फरकाडे, कार्याध्यक्ष राम खरपूरिया, महिला कार्याध्यक्ष सौ.सरिता गाकरे,संपर्क प्रमुख नरेंद्र बडगुजर, महासचिव मोरेश्वर भादे, सचिव दिपक नेवे, कोषाध्यक्ष मुकुंद मुसळे,कराडी समाजाचे महाराष्ट्र अध्यक्ष महादेव बंडा,प्रल्हाद कासकर, शांताराम गुजर, सह कोषाध्यक्ष विकास संसारे, रविंद्र गोलांडे, उपाध्यक्ष विलास पाटील, श्याम सरगिरे, मुकुंद अडेवार, संदीप गोलाईल, अनिल बोरसे,आर डी चौधरी, सुनील महाजन,सतिश गुर्जर कायदेविषयक सल्लागार ॲड.चंद्रकांत बिडकर, .नरेंद्र कापगाते आदी पदाधिकारी सदस्य, मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना अध्यक्ष श्रावण फरकाडे यांनी सांगितले कि आरक्षण हा आमचा हक्क आहे. तो आम्ही कोणत्याही परिस्थितीत मिळणारच. त्यासाठी कितीही संघर्ष करावा लागला तरी चालेल आमचा हक्क आम्ही मिळणारच. आरक्षण ही समाजाच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे. ओबीसी समाजातील विविध जाती उपजाती यांना केंद्रात आरक्षण मिळावे यासाठी रात्रं दिवस ओबीसी महाराष्ट्र कृती समितीचे प्रयत्न सुरु आहे. लवकरच कृती समितीच्या लढ्याला यश प्राप्त होणार आहे. आरक्षणचा प्रश्न मार्गी लावण्याच्या मार्गांवर आहे. आरक्षण साठी १०० हुन जास्त खासदारांना भेटलो. खासदारांनी संसदेत सुद्धा आरक्षण प्रश्नावर आवाज उठविला आहे. महत्वाच्या आरक्षणच्या लढ्यासाठी आम्हाला सर्वांनी साथ द्या. नोकरी तसेच उच्च शिक्षणासाठी समाजातील व्यक्तींना खूप त्रास सहन करावा लागत आहे. आम्ही हक्काचे तेच मागतो. राज्यात आरक्षण आहे परंतु केंद्रात आरक्षण नसल्याने ओबीसी समाजातील अनेक जाती, पोट जातींचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. समाजाच्या न्याय हक्कासाठी व मागण्या पूर्ण करण्याच्या अनुषंगाने दिल्लीत लवकरच आंदोलन करण्याचा मानस आहे. असे श्रावण फरकाडे यांनी सांगितले.संरक्षक मंडळ सदस्य जी एम पाटील यांनीही आपल्या मनोगतात मार्गदर्शन करून कृती संघटनेच्या पाठीशी सर्वांनी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले.नामदेव राऊत यांनी कृती समितीच्या माध्यमातून कशा प्रकारे आरक्षण साठी पत्रव्यवहार केला, पाठपुरावा केला याची माहिती दिली. आरक्षण साठी लढतांना कोणकोणत्या समस्या आल्या त्याला कशा पद्धतीने सामोरे गेले त्या विषयी माहिती दिली. यापुढे हा लढा आणखीन तीव्र करण्याचा विचार त्यांनी बोलून दाखविला. कार्याध्यक्ष राम खरपुरिया यांनी सांगितले कि कृती समितीच्या माध्यमातून आरक्षणच्या न्याय हक्कासाठी एकत्र आलो असून सरकारला विचार करायला




भाग पाडले आहे. लढल्याशिवाय काही मिळत नाही आणि मागितल्या शिवाय काही मिळत नाही. सतत पाठपुरावा सुरु ठेवल्याने केंद्र सरकारने लढ्याची दाखल घेतली असून आरक्षण चे काम ९९% मार्गी लागलेले आहे. लवकरच आपल्याला यश मिळणार आहे. तरी सर्वांनी आपापली जबाबदारी ओळखून काम करावे, पदाधिकारी कार्यकर्त्यांची, सदस्यांची खूप मोठी जबाबदारी आहे त्यामुळे पदाधिकारी कार्यकर्ते सदस्य तितकेच महत्वाचे आहेत. सर्वांनी यासाठी पाठपुरावा सुरु ठेवा. आरक्षणचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी लवकरच देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी साहेब यांची लवकरच भेट घेणार आहोत.न्याय मिळत नसेल तर दिल्ली मध्ये आंदोलन सुद्धा करण्यात येईल असे राम खरपुरिया यांनी सांगितले.वर्धा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सरिता गाकरे यांनी आपल्या मनोगतात आरक्षण विषयी सांगताना जो पर्यंत बाळ रडत नाही तोपर्यंत आई त्याला दुध पाजवत नाही. त्यासाठी सर्वांनी आपली समस्या शासनासमोर मांडली पाहिजे. एक काठी लगेच तुटते परंतु लाकडाची एकत्र असलेली मोळी तुटत नाही. सर्वांनी लाकडाच्या मोळी सारखी एकी ठेवा तरच शासन दरबारीं आपली दखल घेतली जाईल. ओबीसी देशात बहू संख्येने असून पुढच्या पिढीसाठी आरक्षण महत्वाचे आहे असे त्यांनी सांगितले.संरक्षक मंडळ सदस्य पी आर बडगुजर यांनी सांगितले कि आरक्षणचे काम सोप्पे नाही. हा खूप मोठा लढा आहे. आरक्षण साठी खासदारांनी संसदेत आवाज उठविला आहे. महाराष्ट्रातील ओबीसी मधील २७ जाती उपजातीना न्याय द्या ही आमची सात्यत्याने मागणी राहिली आहे. आरक्षण चा विषय सध्या केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे. कॅबिनेट मंत्रिमंडळची मंजुरी व राष्ट्रपतीची मंजुरी प्रलंबित आहे. लवकरच हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कृती समितीचे प्रयत्न सुरु आहेत. या नंतर संपूर्ण राज्यातून आलेल्या विविध जाती उपजातीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना परिचय करून दिला. परिचय कार्यक्रमानंतर पदग्रहण सोहळा संपन्न झाला. यात अनेक मान्यवरांना प्रमाणपत्रे देऊन त्यांच्यावर नवीन जबाबदारी सोपविण्यात आली.कृती समितीच्या वतीने ओबीसीच्या आरक्षण साठी प्रयत्न करणारे केंद्र शासनाच्या मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष हंसराज अहिर व सध्याचे केंद्र शासनाच्या मागासवर्गीय आयोगाचे नवीन अध्यक्ष साध्वी महामंडालेश्वर यांचेही यावेळी आभार मानण्यात आले.दुपारच्या सत्रात विविध ठराव मांडण्यात आले. या ठरावाला सर्वांनी एकमताने हात वर करून जाहीर पाठिंबा दिला. समर्थन दिला. बहुमताने सर्व ठराव पास करण्यात आले.त्यानंतर कराडी समाजाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष मधुकर सुरते यांनी कृती समितीच्या सर्व पदाधिकारी सदस्यांचे व उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.सदर कार्यक्रमाचे सुंदर व उत्तम असे सूत्रसंचालन रोहिदास चौधरी यांनी केले.सदर राज्यव्यापी ओबीसी समाजाच्या मेळाव्याचे उत्तम, सुंदर असे नियोजन केल्याने सर्व मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले.

# हिमायतनगर शहरातील अनाधिकृत पॅथॉलॉजी लॅबचे बिंग फुटले

# डिजिटल स्वाक्षरी,चुकीच्या चाचण्यामुळे रुग्णांचि आर्थिक आणि शाररिक पिळवणूक सुरु

दैनिक वादळ वार्ता
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

शहरा सह ग्रामीण भागात वैद्य पदवी नसलेले चार ते पाच अनाधिकृत बोगस पॅथॉलॉजी लॅब आणि डॉक्टरांचा सूळ सुळाट मोठ्या प्रमाणात वाढत आहे सध्या शहरात साथीचे आजार मोठ्या प्रमाणात होत असताना शहरात काही अनाधिकृत बोगस पॅथॉलॉजी लॅब वाल्यांकडून चुकीच्या चाचणीचे अहवाल, व डिजिटल स्वाक्षरीद्वारे डॉक्टर नसताना डॉक्टर असल्याचा सांगावा करून दहावी,बारावी पासच्या विद्यार्थ्यांना कामाला लावून चुकीचे रिपोर्ट देऊन रुग्णांच्या जीवाशी खेळत असल्याचा प्रकार सुरू या सर्व बाबीवर स्थानिक नगरपंचायत प्रशासन व आरोग्य विभागाचे लागेबंदे असल्याचे काही सुजाण डॉक्टरांनी सांगितले त्यामुळे बोगस पॅथॉलॉजी लॅब वर कार्यवाही करून त्यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करून त्यांच्या लॅबचि परवानगी रद्द करण्याची मागणी पत्रकार नागेश शिंदे यांनी प्रशासनाकडे केली आहे



हिमायतनगर शहरातील नामांकित हॉस्पिटलच्या डॉ. सोबत टक्केवारीच्या जोरावर काही अनाधिकृत पॅथॉलॉजी लॅब वाल्यांकडून रुग्णांचे चुकीचे रिपोर्ट व डिजिटल स्वाक्षरी करून पैसे उकळण्याचा गोरख धंदा शहरात मोठ्या प्रमाणात सुरू आहे या सर्व बाबी वर येथील नगर पंचायत प्रशासन ह्या सर्व घटनेला खत पाणी घालत आहे कुठल्या पॅथॉलॉजी लॅब कडे स्वच्छता प्रमाणपत्र व नगरपंचायत चे ना-हारकर प्रमाणपत्र नसताना सुद्धा मोठमोठे अनधिकृत दुकान थाटून बसले आहेत शहरातील ग्रामीण रुग्णालयाचि टीम व जिल्हा आरोग्य प्रशासन सुद्धा ह्या बाबी कडे कुठलीही कारवाई करत नाही राज्य सरकारने पॅथॉलॉजी लॅब संदर्भात नवीन कायदा अमलात आणून सुद्धा अशा अनाधिकृत पॅथॉलॉजी लॅब वर कुठलीही कारवाई होतांना दिसून येत नाही शहरात या अनाधिकृत लॅब वाल्यांकडून मोठ्या नामांकित हॉस्पिटलमध्ये जाऊन डीएमएलटी चा कुठलाही परवाना नसताना किंवा कुठलीही पदवी नसताना काही जण रुग्णांच्या शरीरातील रक्तसंकलन करण्याचे मोठे रॅकेट हिमायतनगर शहरात सध्या सुरू आहे व त्या रक्ताच्या चाचणीचे चुकीचे रिपोर्ट देऊन, आमच्या लॅब मध्ये डॉक्टर असल्याचा सांगावा करून डिजिटल स्वाक्षरीद्वारे चुकीचे रिपोर्ट देत असल्याचे प्रकार उघड झाले आहे अशा अनधिकृत लॅब वाल्यांकडून रुग्णांची आर्थिक व शारीरिक पिळवणूक होत आहे या सर्व बाबीकडे जिल्हा आरोग्य प्रशासनाने तात्काळ गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.... महाराष्ट्र राज्यात सध्या मोठ्या प्रमाणावर पॅथॉलॉजी लॅब कार्यरत असून रुग्णांच्या आरोग्य तपासणीसाठी नागरिकांचा त्यावर मोठा विश्वास आहे मात्र अलीकडील काळात अनेक लॅब मधून दिल्या जाणाऱ्या तपासणी अहवालाबाबत गंभीर बाबी समोर येत आहेत हिमायतनगर शहरातील काही पॅथॉलॉजी लॅब मध्ये आवश्यक पात्रता नसलेल्या व्यक्तीकडून रिपोर्टवर सही करण्यात येत असल्याचे गंभीर प्रकार आढळून येत आहेत ह्याच पार्श्वभूमीवर हिमायतनगर शहरातील बऱ्याच बड्या हॉस्पिटलमध्ये काही अनधिकृत व्यक्ती कडून पॅथॉलॉजी लॅब चालविल्या जात आहेत शहरातील आरोग्य विभागाचे ह्या गंभीर बाबिकडे नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे ग्रामीण भागात अशाच पॅथॉलॉजी लॅब ची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे त्यात रक्त,मूत्र,बायप्सी, हार्मोन्स अशा विविध चाचण्याच्या तपासण्या वरून डॉ. आपल्या उपचारांची दिशा ठरवतात मात्र काही लॅब मध्ये प्रशिक्षित पॅथॉलॉजिस्ट किंवा मान्यता प्राप्त डॉक्टर नसतानाही तपासणी अहवाल दिले जात असल्याचे गंभीर प्रकार शहरात उघडकीस येत आहेत तर काही ठिकानच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये पॅथॉलॉजिस्ट असल्याचा सांगावा करून डॉक्टर व पॅथॉलॉजीवाल्या मध्ये मिली भगत असल्याचे बोलल्या जात आहे रुग्णांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार टक्केवारीच्या जोरावर मोठ्या प्रमाणात सुरू आहे तर काही ठिकाणी लॅब टेक्निशियन किंवा अन्य कर्मचाऱ्याकडून रिपोर्टवर पॅथॉलॉजिस्ट डॉक्टरांची डिजिटल सही मारून त्यांना रिपोर्ट देण्याचा केविलवाणा प्रयत्न हिमायतनगर शहरातील शासकीय तथा निमशासकीय लॅबमधून होताना दिसून येत आहे या गंभीर बाबीकडे जिल्हा आरोग्य प्रशासन व स्थानिक नगर पंचायत प्रशासनाचे नियंत्रण असल्याचे समजले पण नगरपंचायत प्रशासन शहरातील कुठल्याही अनाधिकृत व अधिकृत पॅथॉलॉजी लॅब वाल्यांना अद्याप ना हारकत प्रमाणपत्र दिले नसल्याचे समजले व शहरातील स्वच्छता प्रमाणपत्र त्यांना देण्यात आले नाही दरवर्षी स्वच्छतेचा कर या पॅथॉलॉजी लॅब कडून आकारला जातो पण हा स्वच्छतेचा कर काही लॅब धारक वगळता इतर कुणीही हा कर भरत नाही हा कर न भरल्यास त्यांना कायदेशीर कारवाई समोरे जावे लागते पण अशी कारवाई कुठेही झाल्याची अद्याप निदर्शनास आले नाही असा आरोप हिमायतनगर शहरातील पत्रकार नागेश शिंदे सह काही राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे त्यामुळे शहरातील रुग्णांच्या रक्त तपासणी अहवालामध्ये मोठा गोंधळ दिसून येत आहे बऱ्याच पॅथॉलॉजी लॅब मध्ये रुग्णांच्या रिपोर्टवर सही कोण करतो, हॉस्पिटलमध्ये येऊन रुग्णांचे रक्त संकलन कोण करतो,त्या व्यक्तीची शैक्षणिक पात्रता काय असावी लॅब मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे शिक्षण व प्रशिक्षण कसे असावे, व त्यांच्या पॅथॉलॉजी सेंटरमध्ये स्वच्छतेची सुविधे सह विविध उच्च दर्जाच्या मशीन उपलब्ध आहेत का? अशा असंख्य बाबीची योग्य तपासणी करून शहरातील रक्त तपासणी अहवालामध्ये उल्लंघन करणाऱ्यावर कठोरात कठोर कारवाई करून त्यांचे परवाने तात्काळ रद्द करण्याची मागणी पत्रकार नागेश शिंदे यांनी नगरपंचायत प्रशासन व आरोग्य विभागाकडे केली आहे...

# ईद मिलन कार्यक्रम अन्वा येथे उत्सवात पार

दैनिक वादळ वार्ता
**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील अन्वा या ठिकाणी ईद कार्यक्रम उत्साहात पार पडला त्या ठिकाणी अमोल खरात सर
शिक्षक संघटना तालुका अध्यक्ष भोकरदन यांनी अनवा येथे जाऊन रमजान ईद कार्यक्रमास शुभेच्छा व पवित्र रमजान ईद' म्हणजे आनंद आणि 'फित्र' म्हणजे दान करणे. रमजान महिन्यातील कडक उपवास संपवून हा सण आनंदाने साजरा करतात ईदची मुख्य वैशिष्ट्ये:




रमजानची सांगता: पवित्र रमजान महिना संपून शव्वाल महिन्याचा चंद्र दिसल्यानंतर हा सण साजरा केला जातो, ज्यामुळे उपवास (रोजा) संपतात
विशेष नमाज: ईदच्या दिवशी सकाळी मुस्लिम बांधव मशिदीत किंवा ईदगाहमध्ये एकत्र येऊन 'ईदची नमाज' (सलात-अल-ईद) अदा करतात
शिरखुर्मा आणि दावत: या दिवशी गोड पदार्थ, विशेषतः 'शिरखुर्मा' तयार केला जातो आणि नातेवाईक व मित्रपरिवाराला बोलावून मेजवानी दिली जाते
दान (फितरा): गरीब आणि गरजू लोकांना मदत म्हणून अन्नाच्या रुपात किंवा पैशांच्या रुपात 'जकात' किंवा 'फितरा' देण्याची परंपरा आहे, जेणेकरून तेही या उत्सवात सहभागी होऊ शकतील
शुभेच्छा: लोक एकमेकांना नवीन कपडे घालून भेटतात आणि ईद मुबारक म्हत शुभेच्छा देतात
हा सण प्रेम, एकोपा, आनंद आणि समाजातील मैत्रीपूर्ण संबंध दृढ करण्याचा संदेश देतो

# नालंदा ऑर्गनायजेशन संस्थेचा आदर्श सरपंच पुरस्कार विक्रम कांबळे यांना जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील येळी देवंग्रा ग्रामपंचायतचे सरपंच विक्रम कांबळे यांना महाराष्ट्रातील अग्रगण्य असलेले नालंदा ऑर्गनायजेशन संस्थेचा मानाचा आदर्श सरपंच पुरस्कार विक्रम कांबळे यांना जाहीर झाला आसुन ,येळी देवंग्रा गावचे सरपंच विक्रम कांबळे यांनी आपल्या येळी देवंग्रा गावातील लोकांसाठी ग्रामपंचायत माध्यमातुन अनेक विकासकामे केल्याने येळी देवंग्रा गावातील शेतकर्यांना सिंचन विहीर व गोटे देने ,गावातील १००-१२० निराधारांना पगारी करणे ,येळी गावातील जिल्हापरीषद शाळा डिजीटल करल एल ई डी देणे ,येळी देवंग्रा गावातील अंतर्गत रस्ते सिमेंट व पेव्हर ब्लॉकचे करत ,खडी केंद्र ते येळी मुख्य रस्ता जलजिवन मिशनचे काम ९०% पुर्ण करणे,येळी गावातील मुख्य चौकात ग्रामपंचायत व येळी ग्रामस्थांच्या सहकार्यातुन छत्रपती शिवाजी महाराज यांचा



अश्वारुढ पुतळा उभारणी केला सह गावातील अनेक विकासात्मक कामे केल्याने या विकास कामाची दखल घेउन आदर्श सरपंच हा पुरस्कार जाहीर केला आहे यावेळी उपसरपंच अजीत धुमाळ ,माणिक लोंढे ,भास्कर बंडगर ,वामन बंडगर ,जयश्री कीरवले ,छायाताई लोंढे,जमाबाई धुमाळ ,शितलताई धुमाळ ,दिपक पाटील ,
श्री संत शिरोमनी मारुती महाराज साखर कारखाना संचालक संतोष भोसले ,केशवराव डांगे, मा.सरपंच बाबुराव धुमाळ ,बळीराम पाटील ,प्रसाद पाटील ,विकास साठे,बाळु साठे ,राजकुमार मांजरेकर ,हनमंत कांबळे ,आशोक माने ,ईश्वर माने ,प्रविन भोसले ,विष्णु कीरवले ,कालीदास डांगे ,ज्ञानेश्वर कीरवले ,रंगराव पाटील ,बाळासाहेब पाटील ,श्रीमंत मोरे ,बलभिम गीरी , विलास कोतापुरे ,शंकर चौधरी ,दयानंद साठे ,मारुती कांबळे ,अजबोद्दीन शेख,
लखन कीरवले ,लखन कीरवले ,प्रकाश कीरवले ,रमेश जाधव ,सह येळी देवंग्रा ग्रामस्थांनी शुभेच्छा दील्या

# हनेगाव व लोणी येथे ईद उत्साहात



दैनिक वादळ वार्ता
**हनेगाव । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे यंदाही हनेगाव व लोणी परीसरातील मुस्लीम बांधवांनी पवित्र रमजान महिन्यातील रोजे मोठ्या श्रध्दा निष्ठा आणि उत्साहात पाळले. यंदा १९ फेब्रुवारी पासून सुरु झालेल्या या पवित्र महिन्यात सलग ३० दिवस उपवास करून २० मार्च रोजी रोजाची सांगता करण्यात आली.

रमजान महिन्यात मुस्लीम बांधव उपवासासोबत प्रार्थना (नमाज) इबादत आणि विविध सत्कर्मात स्वताला वाहून घेतात.

यंदा कडक उन्हाळा असतानाही अनेकांनी अत्यंत श्रद्धेने रोजे पाळले. या काळात परीसरात सामाजिक सलोखा आणि बंधुभावांचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. विशेष म्हणजे अनेक हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टी साठी आमंत्रित करून परस्परातील ऐक अधिक दृढ केले. शनिवारी २१ मार्च रोजी हनेगाव येथील ईदगाह मैदानावर सकाळी सुमारे ९ वाजता सामुहिक नमाज अदा करून ईद-उल-फित्रचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## शस्त्र क्रिया गर्भाशियाची अन् दरम्यान दृष्टी गेली

# डॉ.किल्लारिकर याच्या संत एकनाथ सहकारी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल पैठण येथील प्रकार रुग्णाच्या नातेवाईकाची पोलिसांकडे तक्रार

दैनिक वादळ वार्ता
**पैठण । प्रतिनिधी**

पैठण येथील संत एकनाथ सहकारी (मल्टीस्पेशालिटी) रुग्णालयातील उपचारादरम्यान वैद्यकीय निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करत विनोदकुमार भारद्वाज यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, पैठण यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तक्रारीनुसार, भारद्वाज हे गेल्या २२ वर्षांपासून पैठण येथे वास्तव्यास असून पेंटिंगचे काम करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या पत्नी ममता यांना ओटीपोटात त्रास होत असल्याने प्रथम स्थानिक डायग्नोस्टिक सेंटरमध्ये तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांना संत एकनाथ सहकारी




रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात उपचारादरम्यान दोन दिवस रक्त देण्यात आल्यानंतर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, शस्त्रक्रियेनंतर रुग्ण शुद्धीवर आल्यानंतर तिची दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेल्याचे निदर्शनास आल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.
या घटनेनंतर संबंधित डॉक्टरांनी प्रथम इतर रुग्णालयात पाठवून नंतर तातडीने औरंगाबाद येथे हलविण्याचा सल्ला दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. पुढील उपचाराचा खर्च उचलण्याचे आश्वासन देत रुग्णाला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात केवळ काही रक्कमच देण्यात आली असून उर्वरित खर्च स्वतः करावा लागल्याचे भारद्वाज यांनी नमूद केले आहे.तक्रारदाराच्या मते, आतापर्यंत उपचारासाठी सुमारे १ लाख ७५ हजार रुपये खर्च झाले असून त्यांच्या पत्नीची प्रकृती अद्यापही चिंताजनक आहे. या प्रकरणी संबंधित रुग्णालय व डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळेच ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त
दरम्यान, या प्रकरणात अद्याप संबंधित डॉक्टर किंवा रुग्णालय प्रशासनाची अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. पोलिसांकडून तक्रारीची नोंद घेऊन पुढील चौकशी केली जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

# निष्पक्ष चौकशीसाठी महाराष्ट्र मंत्रीमंडळच बरखास्त करायला पाहिजे बोरशे गुरुजी जिल्हा सचीव आम आदमी पार्टि

दैनिक वादळ वार्ता
**भोकरदन । प्रतिनिधी**

अशोक खरात प्रकरणामुळे सत्ताधारी तर भांबावलेलेच आहेत परंतु विरोधी पक्षाच्या पुढार्यांच्या तोंडात सुध्दा मूग भिजू घातलेले आहेत.कोणीच बोलायला तयार नाही. कारण काय ?
पुरोगामी महाराष्ट्रामध्ये सध्या लाजिरवाण्या गोष्टी घडत असून जनतेचे काम करण्याकडे सरकारचा कल दिसून येत नाही तर आवांतर गोष्टींना जास्त महत्त्व दिले जात आहे. त्यातून असे पूजा पाठ पाद्य पूजा भोंदू बाबा चे स्तोम माजवले जात आहे.बाहेरच्या राज्यातील भोंदू बाबांना सुद्धा राज्यात आमंत्रित करून मोठमोठे कार्यक्रम घेण्याचा घाट ही मंडळी घालत आहेत.
देशाचे (गृ )ग्रहमंत्री राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आणि आख्ख्या मंत्री मंडळाचे फोटो त्या भोंदु खरात सोबत आहेत.सर्वच लाभार्थि आहेत.मग इतक्या महत्वाच्या व्यक्तिची व फाईलची निष्पक्ष चौकशी कशी होणार!आख्खीदालकालीहै।
त्यासाठी हे सरकारच बरखास्त करुन नंतरच निष्पक्ष चौकशी होऊ शकते!
तो भामटा खरात तुमच्या नाकाच्याखाली नाशिक सारख्या स्मार्ट सिटी मध्ये खुले आम एपस्टीन सारखं कांड करीत होता तरीही मोठमोठाले राजकारणी त्याच्या कडे भविष्य पाहायला जात होते. मग नाशिक पोलीस प्रशासन, राजकारण्यांचे दलाल, झोपले होते का? आमच्या चकनाताई तर त्या पवित्र महान तपस्वी संताच्या पाय धूत होत्या त्याच्या डोक्यावर छत्री धरित होत्या..भोंदू बाबा अशोक खरात कडे भेटी घ्यायला जाणारे राजकीय नेते, मंत्री आहेत, त्यांचे फोटो ही सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत !
त्यात देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, जयंत पाटील, निलेश लंके, मिलिंद नार्वेकर, दीपक केसरकर, सुनील तटकरे, धनंजय मुंढे, विखे पाटील, चंद्रकांत पाटील ह्यांचे ही फोटो आहेत, काहींचे पूजा करतानाचे फोटो आहेत मग रुपाली चाकणकर ह्यांच्या चौकशीच्या सोबतच इतरांची ही चौकशी ही झालीच पाहिजे !५८ महिलांवर अत्याचार - बलात्कार करून त्यांचे व्हीडीओ स्वतःच रेकॉर्ड करून पेनड्राईव्हमध्ये ठेवणारा कॅप्टन अशोक खरात हा नराधम म्हणजे महाराष्ट्राचा एपस्टीनच आहे . अशा नीच नराधमाचे आयोगाच्या अध्यक्षाने फक्त पाय धुतले नाहीत, त्याची पापं धुतलीत.
त्याचे धुतलेले पाय तुम्ही तुमच्या पदराने पुसलेत म्हणजे त्याची पापं पुसून टाकून त्याचं चारित्र्य स्वच्छ केलंत आणि त्याच्या डोक्यावर छत्र धरलं म्हणजे त्याच्या सगळ्या आगामी गैरकृत्यांना राजाश्रय दिलाय.
जे फडणवीस स्वतः मुख्यमंत्री होण्यासाठी दोन दोन अघोरी पूजा करतात, ते कोणावर काय घन्टा कारवाई करणार.चौकशी कशी होऊ देणार!
विशेष म्हणजे महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा आहे आणि फडणवीस स्वतः गृहमंत्री आहेत.
काय तर म्हणे डखढ स्थापन केली... मुळात सरकारवाडा, नाशिक पोलिसांकडून केस काढून क्लीन चिट देण्याचा मार्ग सुकर केलाय फडणवीसांनी.
या सरकारवर विरोधी पक्षांचा जरी व विश्वास असला तरी जनतेचा आता विश्वास राहिलेला नाही! सरकारने स्वतःहून पाय अवतार होणे काळाची गरज असून यांच्या काळामध्ये अशा प्रकारच्या अपराध्यांची सखोल चौकशी होऊच शकत नाही आणि खरे गुन्हेगार सापडू शकत नाही कारण गुन्हेगारच खुर्चीवर बसलेले आहेत!

# केज येथे मानवी हक्क अभियानाची भव्य बैठक संघटन विस्तारासाठी मोठा निर्णय

## नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर, तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज येथील शासकीय विश्रामगृह केज येथे मानवी हक्क अभियान संघटनेची एक महत्त्वपूर्ण व भव्य बैठक आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.या बैठकीत संघटनेच्या बळकटी करणा सोबतच आगामी काळातील विस्तार धोरणांवर सखोल चर्चा करण्यात आली.विशेष म्हणजे,या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

बैठकीत संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत केज तालुक्यासाठी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या.उमेश भाऊ आव्हाड यांची केज तालुका अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली असून त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. तसेच महादेव भाऊ जोगदंड यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. याशिवाय ड. सोनवणे साहेब यांची वकील संघाचे सल्लागार म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली,ज्यामुळे संघटनेला कायदेशीर बाबींमध्ये अधिक बळ मिळणार आहे.ही बैठक प्रा.डॉ.मिलिंद नाना आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.त्यांच्या मार्गदर्शना मुळे संघटनेच्या कार्याला दिशा मिळाली.तसेच बीड जिल्हा अध्यक्ष विष्णू बप्पा मुजमुले यांच्या नेतृत्वाखाली बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.यावेळी जिल्हा उपाध्यक्ष महादेव भाऊ उमाप,युवक जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब भाऊ मुजमुले,ज्येष्ठ नेते कल्याण भाऊ ताकतोडे, परमेश्वर भाऊ आडागळे, धारूर तालुका अध्यक्ष किसन भाऊ लोखंडे, आर.पी.आय चे केज तालुका कार्याध्यक्ष ईश्वर सोनवणे,धारूर शहराध्यक्ष पवन भैय्या डोईफोडे,युवा नेते बंडू नाना मुजमुले यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.त्यांच्या उपस्थिती



मुळे बैठकीला अधिक महत्व प्राप्त झाले.तसेच मिठ्ठू पारवे,महादेवलांडगे, सचिन गालफाडे,पांडुरंग कसबे,दिलीप जाधव, नितीन लांडगे,लक्ष्मण हजारे,धनंजय पारवे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.तरुण कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद हे या बैठकीचे विशेष वैशिष्ट्य ठरले.बैठकी दरम्यान वक्त्यांनी मानवी हक्कांच्या रक्षणासाठी संघटनेचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. समाजातील दुर्बल, वंचित आणिअन्यायग्रस्त घटकांसाठी न्याय मिळवून देणे ही संघटनेची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संघटनेचा विस्तार गावागावांत करून सामान्य माणसाचा आवाज बुलंद करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.या बैठकीत संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून आगामी काळात विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली असून त्यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. बैठकीच्या शेवटी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.या बैठकीमुळे मानवी हक्क अभियान संघटनेच्या कार्याला नवी दिशा मिळाली असून भविष्यात संघटना अधिक प्रभावीपणे काम करेल,अशी आशा व्यक्त होत आहे.

# नायगाव जिल्हा परिषद शाळेची अभिमानास्पद कामगिरी शिक्षकांचे कौतुक–राहुल खोडसे



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,नायगाव शाळेने निपुण चाचणी मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत सुपर निपुण शाळा हा मान मिळवला आहे. शाळेतील ८० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांनी चारही अध्ययन क्षमता मध्ये सर्वोच्च स्तर गाठल्याने ही कामगिरी शक्य झाली आहे.या यशाबद्दल संभाजी ब्रिगेड बीडचे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे यांनी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बालासाहेब गोरे,शिक्षक श्री.कुणाल आयवळे, श्री.दत्तात्रय जाधव, संबंधित केंद्रप्रमुख तसेच सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.नायगाव शाळेची ही कामगिरी गावासाठीअभिमानास्पद असून शिक्षकांनी घेतलेले परिश्रम व विद्यार्थ्यांची मेहनत याचे हे फळ आहे.आगामी काळात तालुक्यातील अधिकाधिक शाळांनी सुपर निपुण शाळा हा दर्जा मिळवावा,असेही राहुल खोडसे यांनी नमूद केले.तसेच केंद्रप्रमुख श्री.अण्णासाहेब जाधव (पैठण) व केंद्रीय मुख्याध्यापक श्री.गोविंद मुळे यांनीही संबंधित शाळेचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# नांदूरघाट येथे हिंदू संमेलन उत्साहात संपन्न

## हिंदू संस्कृती,एकता व बंधुभावाचा संदेश नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

सकल हिंदू समाज, नांदूरघाट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हिंदू संमेलन मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडले.या संमेलनाला गावातील तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. कराळे महाराज होते,तर प्रमुखवक्ते म्हणून महेश दादा आनंदगावकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.यावेळी बोलताना महेश दादा



आनंदगावकर यांनी हिंदू संस्कृती,परंपरा आणि सामाजिक एकतेचे महत्त्व अधोरेखित केले. समाजामध्ये एकजूट आणि बंधुभाव वाढवण्या साठी अशा संमेलनांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच युवकांनी समाजकार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.अध्यक्षीय भाषणात ह.भ.प.कराळे महाराज यांनी समाजातील ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे सांगितले.कार्यक्रमाच्या दरम्यान विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये देशभक्तीपर गीत,नृत्य व नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सकल हिंदू समाज, नांदूरघाट यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी मीरा बोरवणकर यांची नियुक्ती करा; शिवसेना महीला संपर्कप्रमुख सौ.रत्नमाला मुंडे यांची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांवरील वाढते अत्याचार आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना, असंख्य महिलावर अत्याचार करणाऱ्या तथाकथित भोंदू बाबाच्या विळख्यात अडकलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यामुळे अन्यायाच्या मगर मिठीतून मुक्त झालेल्या 'राज्य महिला आयोगा'चे अध्यक्षपद एका खंबीर आणि अनुभवी व्यक्तीकडे सोपवण्यात यावे, अशी मागणी जोर धरू लागली असतानाच शिवसेना महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख सौ.रत्नमाला मुंडे यांनी माजी आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांच्या नावाची शिफारस केली असून, बोरवणकर यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष व अनुभवी महिला अधिकाऱ्यामुळेच पिडीत महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.बोरवणकर यांच्या नावाची शिफारस करण्याची कारणे सांगताना सौ.रत्नमाला मुंडे यांनी आपल्या मागणीत मीरा बोरवणकर यांच्या कामाचा गौरव केला आहे. त्या म्हणाल्या की, मीरा बोरवणकर यांनी पोलीस दलात काम करताना अनेक गुंतागुंतीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. विशेषतः महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये त्यांनी घेतलेली कठोर भूमिका वाखणण्याजोगी आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या स्मरणात आहे.तसेच बोरवणकर यांची ओळख एक 'निर्भीड आणि खमक्या अधिकारी' म्हणून आहे. महिला आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थेला अशाच कणखर नेतृत्वाची गरज आहे, जे कोणाच्याही दबावाखाली न येता पिडीतांना न्याय मिळवून देईल. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आयपीएस अधिकारी म्हणून मीरा बोरवणकर यांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे बारकावे जवळून पाहिले आहेत, ज्याचा फायदा आयोगाच्या कामकाजात चांगल्या प्रकारे होईल. सरकारने आता तरी राजकीय पुनर्वसनापेक्षा कामाला प्राधान्य द्यावे अशी ही मागणी त्यांनी केली.

यावेळी बोलताना मुंडे यांनी सत्ताधाऱ्यांवर अप्रत्यक्ष निशाणाही साधला. राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद हे केवळ राजकीय पुनर्वसनाचे साधन बनू नये. तिथे अशा महिलेची नियुक्ती व्हावी, जिने प्रत्यक्ष जमिनीवर उतरून महिलांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी लढा दिला आहे. मीरा बोरवणकर यांचे नाव या पदासाठी अत्यंत योग्य आणि न्यायपूर्ण आहे, असे मुंडे यांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना मुंडे म्हणाल्या की,

**महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न**

गेल्या काही महिन्यांपासून गंभीर आणि बिकट बनलेला आहे.राज्यात महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये झालेली वाढ पाहता, महिला आयोग सक्रिय असणे आवश्यक होते परंतु, महिला आयोगाच्या कामाचा रोख वेगळ्याच दिशेने होत आहे कालच्या प्रकरणावरून स्पष्ट झाले आहे. सौ.रत्नमाला मुंडे यांच्या या मागणीला आता सामाजिक स्तरातून आणि विविध महिला संघटनांकडून मोठा प्रतिसाद मिळतो आहे.



# नाशिकच्या भोंदू अशोक खरातवर कठोर कारवाई करा; नंदुरबार 'अंनिस'चे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नाशिक येथे उघडकीस आलेल्या भोंदू अशोक खरात याने केलेल्या महिलांच्या शोषणाचे तीव्र पडसाद नंदुरबार जिल्ह्यात उमटले आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपीवर आणि त्याला साथ देणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) नंदुरबार जिल्हा शाखेच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी यांना मुख्यमंत्र्यांच्या नावे निवेदन देण्यात आले.अशोक खरात प्रकरण हे केवळ वैयक्तिक गुन्हा नसून त्यामागे बुवाबाजी, अंधश्रद्धा आणि लैंगिक शोषणाचे एक मोठे जाळे असण्याची शक्यता निवेदनात



वर्तवण्यात आली आहे. समाजातील सर्वसामान्यांच्या भीतीचा आणि अडचणींचा गैरफायदा घेत अध्यात्म, ज्योतिष व दैवी शक्तीच्या नावाखाली महिलांची फसवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप अंनिसने केला आहे.या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने स्वतंत्र 'विशेष तपास पथका'द्वारे निष्पक्ष चौकशी व्हावी. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अधिनियम, २०१३ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून दोषींना कडक शासन करावे फलज्योतिषाच्या माध्यमातून लोकांची दिशाभूल करणाऱ्यांनाही कायद्याच्या कक्षेत आणून त्यावर नियंत्रण मिळवावे. पीडित महिलांची ओळख गोपनीय ठेवून त्यांना कायदेशीर व मानसोपचार मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी.आरोपीचे राजकीय व प्रशासकीय लागेबांधे उघड करून त्या संबंधितांवरही कडक कारवाई करण्यात याव.हे निवेदन देताना अंनिसचे राज्य प्रशिक्षण विभाग कार्यवाह कीर्तीवर्धन तायडे, जिल्हा कार्याध्यक्ष वसंत वळवी, सूर्यकांत आगळे, अस्मिता मोहिते, मिनाक्षी आगळे, रेखा तायडे, राजनंदनी मंगळे, सोनल आगळे, मालती मोहिते यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. संपूर्ण राज्यात अशा भोंदूगिरीच्या प्रकरणांचा शोध घेऊन गुन्हे नोंदवण्याचे निर्देश पोलीस यंत्रणेला द्यावेत, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

# तळेगाव येथे रमजान ईद शांततेत व उस्थाहात साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**उमरी । प्रतिनिधी**

येथून जवळच आसलेल्या मुस्लिम बहुल तळेगाव येथे मुस्लिम धर्मीयचा पवित्र सन रमजान ईद उस्थाहत व शांततेत साजरा करण्यात आला सकाळी ९ वाजता ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज अदा करण्यात आली या वेळी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संजय गांधी निराधार समितीचे तालुका अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख, चेअरमन सतीश देशमुख, माजी सरपंच रामु रेड्डी कप्पावार ,गणेश पाटील जाधव, माजी सरपंच दिगंबर इंगळे इत्यादी ने मुस्लिम धर्मीयचे धर्मगुरु मौलाना व वयोवृद्ध नेते चांद पाशा बेग, मोगल अफसर बेग, मोगल मुन्सफ बेग, मोगल यांचे पुष्प गुच्छ व पुष्पहार देऊन सर्व मुस्लिम बांधवाना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077